# ‘बेस्ट’च्या मिनी एसी बस छोट्या रस्त्यांवर धावणार



बेस्ट समितीने मंजूर केलेल्या फोर्स मोटर्स कंपनीच्या ५००मिनी एसी डिझेल बसपैकी पाच बस सोमवारी दाखल झाल्या आहेत. क्षमता २१ प्रवाशांची असून त्यात सात प्रवासी उभ्याने प्रवास करू शकणार आहेत. ही मिनी बस वातानुकूलित असून तिच्या आसनांच्या वरच्या भागातून प्रवाशांना एसीची गारगार हवा येणार आहे. या बसेस गर्दीच्या छोट्या रस्त्यांवरून धावणार आहेत. या बसेसची आरटीओ नोंदणी झाल्यानंतर आठवडाभराने त्या प्रत्यक्षात सेवेत येणार आहे.

**५००** मिनी डिझेल बस

**५** बसेस दाखल

**२१** प्रवासी बसू शकतात

**७** प्रवासी उभे राहू शकतात

गारेगार प्रवास होणार. वाहतूक कोंडीतून मार्ग काढणार.

आरटीओ नोंदणीनंतर आठवडाभराने प्रत्यक्षात सेवेत.